# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## परिवहन महामंडळाच्या निगडी आगारातील कर्मचाऱ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बाबत



**वाहक कर्मचाऱ्याचे नाव:- श्री.पंडित मुरलीधर राठोड**
**हुद्दा:- रोजंदारी चालक कम वाहक क्र.३८७८**



**चालक कर्मचाऱ्याचे नाव:- श्री. जॉर्ज आयुब मसी जेम्स**
**हुद्दा:- हंसा चालक क्र. एच. व्ही.पी.२०३६३**

**केलेली उल्लेखनीय कामगिरी:-**

निगडी डेपो कडील वाहक श्री. पंडित मुरलीधर राठोड (वाहक क्र.३८७८) व चालक श्री. जॉर्ज आयुब मसी जेम्स (चालक क्र. एच.व्ही.पी.२०३६३) हे दिनांक ०१/०९/२०२३ रोजी मार्ग क्र.३५/८ मुकाई चौक ते मनपा (बस क्र. एच ७३) या मार्गावर सकाळ पाळीत ड्युटीस होते. सदर मार्गावर मुकाई चौक ते मनपा अशी ट्रीप घेऊन जात असताना बसमधील एक प्रवासी यांना बसमध्ये हार्ट अटॅक आल्यामुळे आजूबाजूचे प्रवाशांनी आरडाओरडा करून वाहकास सांगितले. त्यामुळे चालक, वाहक यांनी प्रसंगाचे गांभीर्य विचारात घेता प्रवाशांसह बस एम्स हॉस्पिटल औंध या ठिकाणी नेली व हार्ट अटॅक आलेल्या प्रवाशास एम्स हॉस्पिटल मध्ये दाखल केले.

डॉक्टरांनी सदर प्रवाशास चेक केल्यानंतर सदर प्रवासी श्री. विठ्ठल पवार (वय वर्ष ८१, राहणार- अक्षय पार्क, औंध रोड, पुणे) यांना अटॅक आल्यामुळे मृत्यू झाला असल्याचे घोषित केले. वाहक श्री. राठोड व चालक श्री. जेम्स यांनी प्रसंगावधान राखून संबंधित प्रवाशी यांना वैद्यकीय मदत मिळणेकामी तात्काळ हॉस्पिटल मध्ये दाखल केले. मात्र सदर प्रवाशी यांचे दुर्दैवी निधन झाले याचा परिवहन महामंडळाला खेद आहे. तथापि, वाहक व चालक यांनी दाखविलेली कार्यतत्परता कौतुकास्पद व सामाजिक भान राखणारी असून जनमानसांत परिवहन महामंडळाची प्रतिमा उंचावणारी आहे.

---

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या निगडी आगारातील वाहक श्री. पंडित मुरलीधर राठोड व चालक श्री. जॉर्ज आयुब मसी जेम्स यांनी प्रसंगावधान दाखवून केलेल्या उल्लेखनीय कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे.